वर्ष- १२ ■ अंक- २८ ■ मुंबई, मंगळवार,२६ मे २०२६ ते ०१ जुन २०२६ ■ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2

विदर्भात उष्णतेची लाट, या जिल्ह्यांना रेड अलर्ट; हवामान विभागानं काय अंदाज वर्तवलाय?

3 → बलात्कारी व भ्रष्टाचारी यांना तुरुंगात नाही;

वर्ष २०३०-३१ पर्यंत नवीन फार्मसी अभ्यासक्रमांना स्थगिती ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

विश्वास आणि प्रेमाच्या नात्याला काळिमा; टिटवाळ्यात लिव्ह इन रिलेशनचा भयंकर अंत!

गर्लफ्रेंडला घरी बोलावून रात्रभर बेदम मारहाण, डोक्यात टीव्ही आणि पाण्याचा भरलेले हंडे मारून हत्या; आरोपीला अटक



कल्याण, कल्याण आंबिवली बनेलीमधून एक धक्कादायक घटना समोर आला आहे. चारित्र्याच्या संशयावरून लिव्ह-इन पार्टनरची निर्घृण हत्या केल्याची घटना समोर आली आहे. नेहमी मारहाण करतो म्हणून आईकडे राहण्यास गेलेल्या २२ वर्षे तरुणीला आता मारणार नाही म्हणून प्रेमाने बोलावले आणि आरोपी तिच्यावर काळ बनून धावल्याची घटना घडली आहे. रात्रभर बेदम मारहाण करत तिच्या डोक्यात टीव्ही आणि पाण्याचा भरलेले हंडे मारून हत्या केली. रुक्सार अन्सारी असे मयत तरुणीचे नाव तर सतीश उर्फ गुड्डू वाघे असे हत्या करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. विशेष म्हणजे रक्तबंबाळ अवस्थेत पडलेल्या तरुणीला रुग्णालयात उपचारासाठी नेले असता हत्येनंतर आरोपी देखील रुग्णालयाबाहेरच बिनधास्त फिरत होता, अखेर संतप्त कुटुंबीयांनी त्याला चोप देत टिटवाळा पोलिसांच्या ताब्यात दिले. टिटवाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून आरोपीला कठोर कारवाई करा अशी मागणी संतप्त नातेवाईकांनी केली आहे. आंबिवली परिसरातून ही सुन्न करणारी आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या तरुणाने आपल्या २२ वर्षांच्या प्रेयसीची अत्यंत क्रूरपणे मारहाण करत हत्या केली आहे. रुक्सार अन्सारी असं या दुदैर्वी मृत तरुणीचं नाव असून, सतीश उर्फ गुड्डू वाघे असं हत्या करणाऱ्या नराधम आरोपीचं नाव आहे. चारित्र्यावर संशय घेत आरोपीने रुक्सारला लाथाबुक्क्यांनी आणि काठीने बेदम मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता घरातला टीव्ही आणि पाण्याने भरलेला तांब्याचा हंडा तिच्या डोक्यात मारून तिला रक्ताच्या थारोळ्यात पाडलं. या घटनेनंतर गंभीर जखमी रुक्सारला घेऊन तिचे नातेवाईक आधी टिटवाळा आणि नंतर उल्हासनगरच्या सेंट्रल रुग्णालयात पळाले, मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केलं. संतापजनक बाब म्हणजे हत्येनंतर रुग्णालयाबाहेर फिरणाऱ्या या नराधम आरोपीला मुलीच्या नातेवाईकांनी पकडून चांगलाच चोप दिला आणि पोलिसांच्या स्वाधीन केलं आहे. सध्या याप्रकरणी टिटवाळा तालुका पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. विश्वास आणि प्रेमाच्या नात्याला काळिमा फासणारी ही घटना आंबिवली परिसरात घडली. मयत रुक्सार अन्सारी आणि आरोपी सतीश उर्फ गुड्डू वाघे हे दोघे गेल्या २ ते ३ वर्षांपासून लिव्ह-इन रिलेशनशिप मध्ये एकत्र राहत होते. मात्र, काही दिवसांपासून सतीश रुक्सारच्या चारित्र्यावर संशय घेत होता. दोन दिवसांपूर्वीच त्याने तिला जबर मारहाण केली होती, ज्याला कंटाळून रुक्सार आपल्या आई-वडिलांच्या घरी निघून आली होती. काल सायंकाळी आरोपी सतीशने मी तुला पुन्हा मारणार नाही, आपण प्रेमाने संसार करू असं खोटं सांगून रुक्सारला विश्वासाने आपल्या घरी बोलावून घेतलं. मात्र, पहाटेच्या सुमारास त्याचा पुन्हा संशय बळावला.

सतीशने रुक्सारला काठीने आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. रुक्सार जिवाच्या आकांताने ओरडत असताना नराधम सतीशने घरात असलेला टीव्ही आणि पाण्याने गच्च भरलेला हंडा थेट तिच्या डोक्यात घातला. यामध्ये रुक्सार गंभीर जखमी होऊन रक्तबंबाळ अवस्थेत जमिनीवर कोसळली. रुक्सार गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळताच तिच्या कुटुंबीयांनी तात्काळ सतीशच्या घराकडे धाव घेतली. तिला वाचवण्यासाठी नातेवाईकांनी आधी टिटवाळा ग्रामीण रुग्णालयात नेले. मात्र, तिथे अत्यंत आवश्यक असलेला ऑक्सिजन उपलब्ध नसल्याने डॉक्टरांनी तिला दुसऱ्या रुग्णालयात नेण्याचा सल्ला दिला.

या आरोग्य यंत्रणेच्या दिरंगाईमुळे कुटुंबाला तिला उल्हासनगरच्या सेंट्रल रुग्णालयात आणावे लागले, मात्र दुदैर्वाने उपचारापूर्वीच रुक्सारचा मृत्यू झाला होता.आपली मुलगी दगावल्याचे समजताच कुटुंबाचा धीर सुटला. याच दरम्यान आरोपी सतीश हा सेंट्रल रुग्णालयाच्या बाहेरच संशयास्पद रित्या घुटमळत असल्याचे नातेवाईकांच्या निदर्शनास आले. आपली मुलगी गेल्याच्या संतापातून कुटुंबीयांनी आरोपी सतीशला रुग्णालयाच्या आवारातच पकडून बेदम चोप दिला आणि त्याला टिटवाळा पोलिसांच्या स्वाधीन केले. सध्या याप्रकरणी टिटवाळा पोलिसांनी आरोपी सतीश उर्फ गुड्डू वाघे याला ताब्यात घेतले असून तरुणीच्या घरच्यांचा जबाब नोंदवून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. मात्र, या घटनेमुळे तरुण पिढीतील नातेसंबंध आणि क्रूरता पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली असून टिटवाळा परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

सकाळी 8.15 ची वेळ, 'टेडीबेअर'मुळे पिंपरीत खळबळ

बॉम्ब शोधक पथकाची पळापळ अन् सोडला सुटकेचा निश्वास...



पुणे। पिंपरी चिंचवडकरांसाठी आजचा दिवस धाकधुकीचा ठरला. पिंपरी चिंचवडच्या एका गर्ल्स हॉस्टेलच्या बाहेर एक बॉक्स दिसल्याने चांगलीच खळबळ उडाली. अज्ञात व्यक्तीने हा बॉक्स ठेवला. अचानक दिसलेल्या या वस्तूमुळे सर्वांचेच धाबे दणाणले. यात बॉम्ब तर नाही ना? अशी भीती निर्माण झाली. त्यानंतर लगेचच पोलिसांना पाचारण करण्यात आले. पोलिसांनीही या संपूर्ण परिसराचा ताबा घेत नाकेबंदी केली. त्यानंतर पोलिसांनी हा बॉक्स मोठ्या शिताफिने उघडाल, तोच त्यात... पिंपरी चिंचवडच्या संत तुकाराम नगरमधील डीवाय पाटील विद्यापीठाच्या गर्ल्स हॉस्टेलवर आलेल्या एका गिफ्ट पॅकेजमुळे मोठी खळबळ उडाली. डीवाय पाटील राजे राजेश्वरी गर्ल्स हॉस्टेलच्या गेटवर सकाळी 8.15 च्या सुमाराला एक भला मोठा गिफ्टचा बॉक्स ठेवण्यात आला होता. त्या बॉक्सचा संशय आल्याने सुरक्षा रक्षकाने पोलिसांना फोन केल्यानंतर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस घटनास्थळी दाखल झाले. या घटनेमुळे विद्यापीठाच्या परिसरात एकच खळबळ उडाली होती. विद्यार्थीनीं आणि विद्यार्थ्यांमध्येही मोठी खळबळ उडाली. पुण्यात गेल्या काही दिवसांपासून बॉम्ब ठेवल्याचे निनावी फोन येत आहेत. या पार्श्वभूमीवर पोलीस अलर्ट झाले होते. काही दिवसांपूर्वी पुण्याच्या खासगी हॉस्पिटलमध्ये स्फोटकं ठेवल्याच्या आरोपाखाली एका व्यक्तीला अटक केली होती. या व्यक्तीने केवळ पैसे वसूल करण्यासाठी हा प्रकार केला होता. त्याच्याकडे रुग्णालयात जाण्यासाठी पैसे नव्हते म्हणून त्याने हा प्रकार केल्याचं उघड झाले होते.

अन् सर्वांनीच...

दरम्यान, आज गर्ल्स होस्टेलच्या बाहेर अचानक मोठा बॉक्स दिसल्याने पोलिसांनी या परिसरात नाकेबंदी केली. संपूर्ण परिसराचा ताबा घेतला. कुणालाही परिसरात सोडण्यात येत नव्हते. मुलींनाही बॉक्सच्या आसपास जाण्यास मज्जाव करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी स्वतः हा बॉक्स उघडला. त्यात एक टेडी बियर ठेवलेला आढळला. त्यामुळे पोलीस अधिक सतर्क झाले. टेडी बियरमध्ये तर बॉम्ब नाही ना? असं प्रत्येकाच्या मनात आलं. त्यानंतर टेडी बियरची तपासणी करण्यात आली तर त्यात असं काही नव्हतं. बॉक्समध्ये केवळ टेडी बियर होता. बॉम्ब नव्हता हे स्पष्ट झालं. त्यामुळे पोलीस, वसतिगृहातील मुली आणि विद्यापीठ प्रशासनाने सुटकेचा निःश्वास सोडला.

पोलिसांनी पोलिसांनी बॉक्सची तपासणी करत बॉक्स उघडल्यानंतर त्यामध्ये टेडी बियर असल्याचं स्पष्ट झालं. पण पुण्यात नुकत्याच घडलेल्या बॉम्ब ठेवण्याच्या प्रकाराच्या पार्श्वभूमीवर बॉक्समुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर या बॉक्समध्ये कोणतीही धोकादायक वस्तू नसल्याचे स्पष्ट झाल्याने सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला, अशी माहिती पोलीस निरीक्षक गोरख कुंभार यांनी दिली.

तो कोण?

पोलिसांनी अधिक तपास केल्यानंतर होस्टेलवरच्या एका मुलीला तिच्या बॉयफ्रेंडने हा टेडी बियर गिफ्ट पाठवला असल्याचं स्पष्ट झालं. मात्र, मैत्रीणीसाठी टेडी बियर ठेवणारा व्यक्ती कोण? आणि होस्टेलमधील ती मुलगी कोण? याचा शोध अजून लागलेला नाही. पोलीस याचा तपास करत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

दीड महिन्यात 26 भोंदूबाबांवर गुन्हे दाखल; हे हिमनगाचं टोक, अंनिसचा दावा



मुंबई : राज्यात गेल्या काही दिवसांपासून भोंदूगिरीविरोधातील मोहिमेने वेग घेतला आहे. नाशिकचा कथित भोंदू बाबा अशोक खरात याच्या अटकेनंतर महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली असून, अवघ्या दीड महिन्यात राज्यात तब्बल 26 भोंदूबाबांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, यापैकी 15 गुन्हे हे मुंबई, पुणे आणि नाशिक यांसारख्या विकसित शहरांमध्ये दाखल झाले आहेत. हे प्रमाण म्हणजे केवळ ह्याहिमनगाचे टोकह्न असून राज्यात अजूनही अनेक भोंदूंचे बस्तान असल्याचे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे (अनिस) डॉ. हमीद दाभोलकर यांनी स्पष्ट केले. अशोक खरात प्रकरणातील धक्कादायक खुलासे असलेल्या 9 गुन्ह्यांपैकी दोन प्रकरणांत पोलिसांनी आरोपपत्र (चार्जशीट) दाखल केले आहे. उर्वरित गुन्ह्यांचे दोषारोपपत्रही लवकरच सादर केले जाणार आहे. खरातने महिलांना विविध प्रकारे धमकावून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे धक्कादायक वास्तव या आरोपपत्रातून समोर आले आहे. या प्रकरणाने राज्यभरात मोठी जनजागृती झाली असून, आता अनेक पीडित लोक समोर येऊन पोलिसांकडे दाद मागत आहेत. शिक्षण पद्धतीत बदलाची गरज अंनिस गेल्या 25 वर्षांपासून वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या प्रसारासाठी प्रयत्न करत आहे. डॉ. दाभोलकर यांच्या मते, नवीन शैक्षणिक धोरणात शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चिकित्सक मनोभाव निर्माण करण्यासाठी शासनाने विशेष पुढाकार घेणे आवश्यक आहे. जेव्हा लोक विचार करायला लागतात, तेव्हाच ते भोंदूंच्या तावडीत सापडत नाही. दुदैर्वाने, विचार करणारे नागरिक अनेकदा राज्यकर्त्यांना नको असतात, म्हणूनच शालेय शिक्षणात वैज्ञानिक दृष्टीकोनाचा आग्रह राज्यकर्ते धरत नाही. त्यामुळे या विषयावर लोकांचा रेटा निर्माण होण्याची गरज आहे. सावधानता बाळगण्याचे आवाहन आपण बाजारात किराणा माल घेतानाही त्याची चौकशी करतो, मग स्वतःच्या आयुष्यातील महत्त्वाचे निर्णय घेताना किंवा संकटाच्या वेळी कोणाकडे मदत मागतोय, याची चौकशी का करत नाही? असा रोकडा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. नागरिकांच्या मदतीसाठी अंनिसने स्थानिक पोलिसांच्या सहकार्याने हेल्पलाईन सुरू केली आहे. भोंदू बाबाकडून फसवल्या गेलेल्या लोकांनी या 9922048832 आणि 8087876809 हेल्पलाईन नंबरचा वापर करावा असे आवाहन डॉ. हमीद दाभोलकर यांनी केले. तसेच अशोक खरात आणि सोलापूरचा मनोहर मामा यांसारख्या प्रकरणांमुळे कायद्याचे यश दिसत असले, तरी समाजातील अंधश्रद्धेचे मूळ उपटून टाकण्यासाठी लोकसहभाग आणि वैचारिक क्रांतीची गरज आहे, असे डॉ. दाभोलकर म्हणाले.

- दीड महिन्यात 26 भोंदूबाबांवर गुन्हे दाखल
- अशोक कुमार खरात , नाशिक
- गडगेबाबा (राजेंद्र गडगे) , संगमनेर , अहिल्यानगर
- चेतन सुनील माळी (मूर्तिजापूर, अकोला)
- पंकज देवराम घोलप, (येडगांव, पुणे)
- मोहन मामा भोसले, (कुरूडवाडी, सोलापूर)
- नाना बर्डे , (आळे फाटा , पुणे)
- ऋषिकेश वैद्य (वसई .मुंबई)
- अल्ताफ रईस खान (मालाड, मुंबई)
- रिधम पांचाळ (मालाड, मुंबई)
- गणेश शिंदे (श्रीरामपुर, अहिल्यानगर)
- अर्जुन चव्हाण उर्फ टनटन बाबा , नवी मुंबई
- विठोबा वाल्मीक जाट, सातपूर, नाशिक
- किसन तळपे मंदोशी, खेड
- महेशगिरी (महेश काकडे) निफाड,नाशिक
- अब्दुल रशीद शेख, खालापूर, रायगड
- इरफान नियाज अहमद , कांदिवली , मुंबई
- अनिल सोलोमन सिंग (पादरी) , पुणे
- शिवराम पराश सावर, पालघर
- अल्ताफ हसन मदारी, जळगाव
- नाना महाराज उर्फ गुरु माऊली वीरकर, टेंभुर्णी . सोलापूर
- पिंटू धुमाळ बारामती, पुणे
- हेमदास किसन बावणे,अड्याळ,भंडारा
- चंद्रकांत राजेंद्र माळी , इगतपुरी, नाशिक
- अशोक मधुकर आढाव, श्रीरामपूर,अहिल्यानगर
- औदुंबर दरवाडे , स्वारगेट, पुणे
- रवींद्र एरंडे, सातपूर, नाशिक

३४ कोटींच्या हेरॉईनसह पाच जण जेरबंद; कल्याणमधील मुख्य पुरवठादार अखेर पोलिसांच्या ताब्यात



कल्याण : ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ-३ अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथकाने तब्बल ३४ कोटी १८ लाख ८४ हजार रुपयांच्या हेरॉईन (गर्द) प्रकरणाचा पदार्फाश करत मुख्य पुरवठादारासह पाच आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत एकूण ९ किलो ७६८ ग्रॅम वजनाचा हेरॉईन जप्त करण्यात आला असून, कल्याण, मुंबई, नाशिक आणि इतर राज्यांपर्यंत पसरलेल्या अंमली पदार्थ साखळीचा मोठा भांडाफोड झाला आहे. ही कारवाई पोलीस उप आयुक्त परिमंडळ-३, कल्याण यांच्या आदेशानुसार अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक आणि महात्मा फुले चौक पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने केली.

स्मशानभूमीजवळ संशयास्पद हालचाल; दोन जण ताब्यात १ एप्रिल २०२६ रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास पोलिसांचे पथक महात्मा फुले चौक पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत असताना सांगळेवाडी स्मशानभूमीजवळ दोन संशयित इसम दिसले. त्यांच्या पाठीवरील बॅगमुळे पोलिसांचा संशय बळावला. पोलिसांनी चौकशीसाठी पुढे जाताच दोघांनी पळण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी पाठलाग करून त्यांना जागीच पकडले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये कासिम अब्दुल सत्तार वसईकर (रा. शहापूर) आणि कृष्णा नागप्पा हळेमणी (रा. सायन कोळीवाडा, मुंबई) यांचा समावेश आहे.

बॅगेत सापडले ९ किलोहून अधिक हेरॉईन

पंचांसमक्ष घेतलेल्या झडतीत आरोपींकडून ९ किलो २३६ ग्रॅम वजनाचे हेरॉईन आणि ३९ हजार रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ३२ कोटी ३२ लाख ९९ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. घरझडतीत आणखी सव्वा पाचशे ग्रॅम हेरॉईन तपासादरम्यान आरोपी कासिम वसईकर याच्या शहापूर येथील घराची झडती घेण्यात आली. त्यामध्ये आणखी ५३१.६९ ग्रॅम वजनाचे हेरॉईन जप्त करण्यात आले. या साठ्याची किंमत सुमारे १ कोटी ८५ लाख ८५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले.

त्यामुळे या संपूर्ण कारवाईत जप्त हेरॉईनचे एकूण वजन ९ किलो ७६८ ग्रॅमपर्यंत पोहोचले.

मुख्य पुरवठादार अमजद पठाण अटकेत

तपासाच्या धागेदोऱ्यांवरून हे हेरॉईन कल्याणमधील अमजद युसुफ पठाण याने पुरवल्याचे उघड झाले. अमजद पठाण हा मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ पुरवठा साखळी चालवत असल्याचा पोलिसांचा दावा आहे. तो आरोपी गणेशन पुथुस्वामी जंगमार उर्फ अण्णा याला व्यावसायिक व्यवहारासाठी हेरॉईन उपलब्ध करून देत होता.

तसेच कासिम वसईकर आणि सद्दाम गफुर शेख हे दोघे अमजद पठाणकडून अंमली पदार्थ विविध व्यावसायिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम करत असल्याचे तपासात स्पष्ट झाले. पोलिसांनी गणेशन जंगमार याला ५ एप्रिल रोजी, तर सद्दाम शेख याला ६ एप्रिल रोजी अटक केली. मुख्य आरोपी अमजद पठाण याला २१ मे रोजी अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्याला १ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

आरोपींवर गंभीर गुन्ह्यांची नोंद मुख्य आरोपी अमजद पठाण याच्यावर यापूर्वी खून, दरोडा, मोक्का, एनडीपीएस, शस्त्रास्त्र कायदा यांसह अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्याच्यावर ठाणे, मुंबई, मध्य प्रदेश आणि राजस्थानमधील विविध पोलीस ठाण्यांत गुन्हे नोंद आहेत. तर कासिम वसईकर याच्यावर यापूर्वी तीन एनडीपीएस गुन्हे दाखल असून, सद्दाम शेख याच्यावर चोरी, जबरी चोरी आणि इतर गुन्ह्यांची नोंद आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही कारवाई ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सहपोलीस आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त संजय जाधव, पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक होनमाणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.


कारागृहात असूनही भोंदू खरात कमवतोय कोट्यवधींची रक्कम


ठाणे। भविष्यवाणी, अंकज्योतिषाच्या माहितीचा बनाव रचून अनेकांची फसवणूक करणाऱ्या आणि महिलांच्या अत्याचाराचा गंभीर आरोप असणाऱ्या अशोक खरातच्या दुष्कृत्यांचा दर दिवशी नवा पाढा वाचला जात आहे. त्यातच आता एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. जिथं खरात कोठडीत असूनही त्याची कमाई सुरूच आहे, बरं कमाईचा आकडा कोट्यवधींच्या घरात आहे, ज्यामुळं अनेकांचेच डोळे चमकले आहेत. राहिला मुद्दा खरातची ही कोट्यवधींची कमाई नेमकी होतेय कुठून, याबाबतचा तर त्यामागचं कारणसुद्धा लक्षवेधी आहे. खरात कुठून कमवतोय इतकी मोठी रक्कम? खरातच्या खात्यावर येणारी कोट्यवधींची रक्कम ही रिंग रोड साठीच्या भूसंपादनातून येत असून, त्याला एकदोन नव्हे तर तब्बल तीन कोटी रुपये मिळणार आहेत. ज्यामुळं कारागृहात असूनही भोंदू अशोक खरातची कमाई सुरूच आहे असं म्हटलं जात आहे. रिंग रोड साठी केवळ दोन जागांच्या भूसंपादनातून त्याला सुमारे अडीच कोटी रुपये मिळणार आहेत. तर, गवळणे परिसरात अशोक खरात आणि पत्नी कल्पना खरात या दोघांना 82 लाख 83 हजार रुपये मिळणार आहेत. पाथर्डी परिसरात तृप्तबाला आणि सृष्टी खरातला मिळणार एक कोटी 82 लाख रुपये मिळणार आहेत. सोबत निलंबित उपजिल्हाधिकारी भांडे पाटील यांच्या पत्नीलाही लाखो रुपये मिळणार असल्याची माहिती समोर आली आहे. खरात खरेदीप्रक्रियेत उपस्थित राहण्याची शक्यता नसल्याने दर कमीसुद्धा होऊ शकतात अशी प्राथमिक माहिती समोर येत आहे. मात्र, भूसंपादनाचा फायदा घेण्यासाठी दोन्ही मुलींना उपस्थित राहणे आवश्यक असेल ही बाबसुद्धा महत्त्वाची. खरात प्रकणी मुंबईतील उपजिल्हाधिकारी निलंबित दरम्यान, खरात प्रकरणात नुकतंच मुंबईतील उपजिल्हाधिकारी अभिजित भांडे-पाटील यांच्यावर निलंबनाची कारवाईसुद्धा झाली. तपासातील माहितीनुसार, भांडे-पाटील यांनी खरातच्या पत्नी आणि मुलीच्या नावावर असलेल्या जमिनींमध्ये मोठी गुंतवणूक केली होती. खरात आणि भांडे यांच्यात तब्बल 143 वेळा फोनवर संभाषण झालं होतं. एका जबाबदार पदावर असलेल्या अधिकाऱ्याने गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या व्यक्तीच्या कुटुंबासोबत आर्थिक व्यवहार केल्यामुळे सरकारने ही मोठी कारवाई केली.




विदर्भात उष्णतेची लाट, 'या' जिल्ह्यांना 'रेड अलर्ट'; हवामान विभागानं काय अंदाज वर्तवलाय ?














महाराष्ट्रासह मध्य, आणि वायव्य भारतातील मोठ्या प्रदेशात उष्णतेची लाट आल्याचं भारतीय हवामान विभागानं जाहीर केलं असून विदभार्तील काही जिल्ह्यांत तर तीव्र तापमानासाठी रेड अलर्ट दिला आहे.

वर्धा इथे तर पारा 47 अंश सेल्सियसवर पोहोचला असून, अकोला, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, यवतमाळ इथेही 45 अंश सेल्सियसपेक्षा जास्त तापमानाची नोंद झाली.

पुढच्या चार पाच दिवसांत विदभार्तील जिल्ह्यांमध्ये तीव्र ते अति तीव्र उष्णतेच्या लाटेचा इशाराही हवामान विभागानं दिला आहे.

विदभार्तील प्रमुख शहरांचं तापमान

20 मे रोजी वर्धा इथे सर्वाधिक 47.1 अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. महाराष्ट्रातलं हे आज नोंदवलं गेलेलं सर्वाधिक तापमान आहे.

विदभार्तील प्रमुख शहरांचे तापमान

फोटो कॅप्शन,विदभार्तील प्रमुख शहरांचे तापमान

विदर्भात रेड अलर्ट, कोकणात पाऊस

20 मे रोजी मुंबई आणि नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्रांनी जाहीर केलेल्या माहितीनुसार अकोला, अमरावती आणि वर्धा या जिल्ह्यांत उष्णतेच्या लाटेची तीव्रता सर्वात जास्त जाणवण्याची शक्यता आहे.

त्यामुळे या तीन जिल्ह्यांत 20 मेची रात्र आणि 21 मे साठी रेड अलर्ट दिला आहे.

या तीनही जिल्ह्यांत काही ठिकाणी दिवसा उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहेच, शिवाय तुरळक ठिकाणी रात्रीचं किमान तापमानही दोन दिवस जास्तच राहील.

यवतमाळमध्येही 20 आणि 21 मे रोजी उष्णतेच्या लाटेसाठी ऑरेंज अलर्ट आहे. तर नागपूर आणि चंद्रपूरमध्ये 20 मे रोजी यलो अलर्ट आणि 21 मे रोजी ऑरेंज अलर्ट दिला आहे.

विदर्भातल्या या सर्व जिल्ह्यांमध्ये 21 मे नंतरही किमान तीन दिवस उष्णतेची तीव्रता कायम राहील.

दरम्यान, दक्षिण कोकण आणि लगतचा दक्षिण मध्य महाराष्ट्राचा भाग तसंच मराठवाड्याच्या काही भागात तुरळक ठिकाणी वादळी वारे आणि हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. कोकण किनारपट्टीसह मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी हवामान अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

सध्या नैऋत्य मोसमी वा[]यांची उत्तरी सीमा अंदमानमधून जात असून, पुढच्या तीन चार दिवसांत मान्सून आगेकूच करण्याची अपेक्षा आहे.

मान्सून कुठे तयार होतो?

मान्सूनची निर्मिती कशामुळे होते, याविषयी काही सिद्धांत आहेत.

पृथ्वी 21 अंशांमध्ये कलली आहे. त्यामुळे तिचा उत्तर गोलार्ध सूर्याच्या दिशेला असतो. परिणामी उत्तर गोलार्धात उन्हाळा असतो, तेव्हा दक्षिण गोलार्धात थंडी असते.

जास्त तापमान असतं तिथे हवेचा दाब कमी तर कमी तापमानाच्या ठिकाणी हवेचा दाब जास्त असतो. वारे नेहमी जास्त दाबाच्या पट्ट्याकडून कमी दाबाच्या पट्ट्याकडे वाहतात.

जमिनीपेक्षा समुद्राचं तापमान थोडं थंड असतं, त्यावेळी समुद्राकडून वारे वाहू लागतात. येताना हे वारे समुद्रावरचं बाष्प आणतात, त्यातून पाऊस पडतो.

पण हे असं चित्र पृथ्वीच्या इतर अनेक ठिकाणी होतं. मात्र भारतीय उपखंडातली स्थिती थोडी खास बनवते.

अरबी समुद्राकडून भारतीय द्वीपकल्पाकडे वाहणारे वारेफोटो स्रोत,इइउ हएअळलएफ

फोटो कॅप्शन,अरबी समुद्राकडून भारतीय द्वीपकल्पाकडे वाहणारे वारे

भारतीय द्वीपकल्पाचा आकार मोठा असून उन्हाळ्याच्या दिवसांत इथलं तापमान वेगानं खूप वाढतं आणि जमीनही तापते.

विशेषतः मे महिन्यापर्यंत राजस्थानच्या वाळवंटात उष्णता वाढते. त्याचवेळी अरबी समुद्राच्या आसपासच्या प्रदेशात म्हणजे आफ्रिका, सौदी अरेबियन द्वीपकल्प यांचं तापमानही वाढतं.

परिणामी हिंदी महासागरातून उत्तर गोलार्धात आलेले वारे भारतीय द्वीपकल्पाकडे वाहू लागतात. या वा[]यांसोबत मोठ्या प्रमाणात बाष्पही येतं. त्यातून ढगांची निर्मिती होते आणि पाऊस पडतो.

ऑक्टोबर उजाडेपर्यंत तापमान आणि वा[]यांच्या दिशेचं गणित बदलतं, वारे ईशान्येकडून वाहू लागतात.

मान्सून हा शब्द कुठून आला? मान्सूनचे प्रकार कोणते?

काही भाषातज्ज्ञांच्या मते, मान्सून या शब्दाचं मूळ अरबी भाषेतल्या मौसीम या शब्दात आहे. मौसीम म्हणजे मोसमी वारे किंवा ऋतूनुसार वाहणारे वारे.

दक्षिण आशियात ठराविक काळात मोसमी वा[]यांमुळे पाऊस पडतो. इतका की त्या काळाला पावसाळ्याचा ऋतू म्हणून इथे स्वतंत्र ओळख मिळाली आहे.

याच मोसमी वा[]यांसाठी मान्सून हा शब्द ब्रिटिशकालीन भारतात वापरला जाऊ लागला.

माळशेज घाटात जमलेले मान्सूनचे ढगफोटो स्रोत,ऋएळळ क्टअऋएर

फोटो कॅप्शन,माळशेज घाटात जमलेले मान्सूनचे ढग

भारतात जून ते सप्टेंबर या काळात वारे नैऋत्य दिशेकडून म्हणजे साधारण अरबी समुद्राकडून हिमालयाकडे वाहतात. या वा[]यांना नैऋत्य मोसमी वारे किंवा नैऋत्य मान्सून (साऊथ-वेस्ट मान्सून) म्हणून ओळखतात.

तर ऑक्टोबर महिन्यात वारे याच्या उलट दिशेने म्हणजे ईशान्येकडून वाहतात. त्यांना ईशान्य मोसमी वारे किंवा ईशान्य मान्सून (नॉर्थ वेस्ट मान्सून) म्हणतात. या वा[]यांमुळे ऑक्टोबर ते डिसेंबर या काळात दक्षिण भारतात, प्रामुख्यानं तामिळनाडूमध्ये पाऊस पडतो.

नैऋत्य मान्सूनच्याही 2 शाखा आहेत झ्र एक अरबी समुद्रातली आणि दुसरी बंगालच्या उपसागरातली.

मान्सून आपल्यासारखं कॅलेंडर मानत नाही, पण आकडेवारीसाठी सोयीचं म्हणून भारतीय हवामान विभागातर्फे 1 जून ते 30 सप्टेंबर हा नैऋत्य मान्सूनचा कालावधी म्हणून गणला जातो.

तर ईशान्य मान्सून साधारण 20 ऑक्टोबरच्या आसपास सक्रीय होतो.

मान्सूनमुळे किती पाऊस पडतो?

भारतात साधारण 80 टक्के पाऊस हा नैऋत्य मान्सूनमुळे पडतो, तर साधारण 11 टक्के पाऊस ईशान्य मान्सूनमुळे पडतो असं हवामान खात्याच्या नोंदी सांगतात.

भारतात जून ते सप्टेंबर या काळात सरासरी 87 सेंटीमीटर एवढा पाऊस पडतो.

मान्सून का महत्त्वाचा?

जून- सप्टेंबर या मान्सूनच्या काळात साधारणपणे वर्षभरातील 70 टक्के पाऊस पडतो. यामुळे शेतीसोबतच, नद्या, धरणं, तलाव, विहिरी भरण्यासाठी मान्सून महत्त्वाचा ठरतो.

मान्सूनमुळे पडणा[]या पावसामुळे तीव्र उष्णतेपासून सुटका होते. पण अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनंही मान्सून महत्त्वाचा आहे. दक्षिण आशियातल्या अर्थव्यवस्था त्यावर अवलंबून आहेत.

भारतातली शेती मान्सूवरच अवलंबून आहे.भारतासारख्या शेतीप्रधान देशात आजही अनेक गणितं पावसावर अवलंबून असतात. एका रिपोर्टनुसार भारतातील जवळपास अर्धी शेती ही मान्सूनवरच्या पावसावर अवलंबून आहे.

भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेसाठी मान्सून ही लाइफलाईन मानली जाते. कमी किंवा जास्त पावसानं शेतीचं नुकसान होतं. 1925 मध्ये ब्रिटनच्या रॉयल कममिशन ऑन ॲग्रिल्चर इन इंडियानं एका अहवालात भारतीय अर्थव्यवस्था म्हणजे मान्सूनचा जुगार असल्याचं म्हटलं होतं. 100 वर्षांनंतरही परिस्थिती बदललेली नाही.

एल निनो, ला निना आणि मान्सून एल-निनो आणि ला-निना ही पॅसिफिक महासागरातल्या सागरी प्रवाहांच्या विशिष्ट स्थितींची नावं आहेत.

पॅसिफिक महासागरात दक्षिण अमेरिकेच्या आसपास पाण्याचे तापमान जेव्हा नेहमीपेक्षा वाढते आणि ते गरम पाणी पश्चिमेला आशियाकडे सरकते, तेव्हा त्या स्थितीला 'एल-निनो' असं संबोधलं जातं. ला निना ही त्याउलट स्थिती आहे.

एल निनो, ला निना आणि मान्सून

या एल निनो आणि ला निना प्रवाहांचा जगभरातल्या हवामानावर आणि भारतातल्या मान्सूनवरही परिणाम होताना दिसतो.

साधारणपणे भारतात एल निनोच्या काळात कमी तर ला निनाच्या काळात जास्त पाऊस पडताना दिसतो.

पण फक्त एकट्या एल निनोमुळे मान्सूनवर परिणाम होत नाही. तर एल निनोसारखाच हिंदी महासागरात इंडियन ओशन डायपोल अर्थात क्डऊहा प्रवाहही महत्त्वाचा ठरतो.

मान्सूनचा दीर्घकालीन अंदाज असा वर्तवला जातो

मान्सूनचा अंदाज वर्तवण्यासाठी काही प्रमुख गोष्टींचा आधार घेतला जातो. त्यातल्या 4 गोष्टी आहेत :

1. इंडियन ओशन डायपोल (क्डऊ) म्हणजेच हिंदी महासागरातील द्विध्रुव. अर्थात या महासागराच्या पूर्व आण पश्चिम भागांतील पाण्याचं असमान तापमान.

क्डऊसकारात्मक असतो, म्हणजे पश्चिम हिंदी महासागराचं तापमान पूर्वेपेक्षा जास्त असतं, तेव्हा ती स्थिती भारतात मान्सूनला पोषक ठरताना दिसते.

2. एल निनो सदर्न ऑसिलेशन (एठरड) म्हणजे पॅसिफिक महासागरातील एल निनो प्रवाहाची स्थिती.

पॅसिफिक महासागरात दक्षिण अमेरिकेच्या आसपास पाण्याचे तापमान जेव्हा नेहमीपेक्षा वाढते आणि ते गरम पाणी पश्चिमेला आशियाकडे सरकते, तेव्हा त्या स्थितीला 'एल-निनो' असं संबोधलं जातं. ला निना ही त्याउलट स्थिती आहे.

या एल निनो आणि ला निना प्रवाहांचा जगभरातल्या हवामानावर आणि भारतातल्या मान्सूनवरही परिणाम होताना दिसतो.

साधारणपणे भारतात एल निनोच्या काळात कमी तर ला निनाच्या काळात जास्त पाऊस पडताना दिसतो.

3. उत्तर गोलार्धात हिवाळा आणि वसंत ऋतूत झालेला हिमवर्षाव कमी असतो, तेव्हा त्या वर्षी मान्सूनच्या काळात भारतात पाऊस सहसा जास्त पडतो.

4. जेट स्ट्रीम या वातावरणाच्या वरच्या थरातील हवेच्या प्रवाहाचाही मान्सूनवर, विशेषतः मान्सूनच्या आगमनावर परिणाम होतो.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार,२६ मे २०२६ ते ०१ जुन २०२६

संपादकीय



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

बलात्कारी व भ्रष्टाचारी यांना तुरुंगात नाही; तर फास्टट्रॅक कोर्टच्या माध्यमातून फासावर लटकविले पाहिजे



देशाचे अट्टल गुन्हेगार लैंगिक अत्याचारी व भ्रष्टाचारी आहेत कारण या दोन्ही गुन्हेगारांनी देशाचे संपूर्ण वाटोळे केले आहे. अत्याचाऱ्यांनी देशाच्या सभ्यतेवर व संस्कृतीवर काळीमा फासला;तर भ्रष्टाचाऱ्यांनी देशाच्या गोरगरीब जनतेचे रक्त पिऊन देशाला हवालदिल केले आहे.देशात वाढते मुलींवरील व महिलांवरील अत्याचार,मुलींचे व महिलांचे अपहरण या घृणास्पद वाढत्या घटनेने देश हादरला आहे.परंतु अत्याचाराच्या घटना थांबायला तयार नाही.महाराष्ट्रात दररोज २७ मुली ठरतात वासनेचा बळी,यावरून आपण समजू शकतो की देशात २८ राज्य आणि ८ केंद्रशाशित प्रदेश आहेत याही ठिकाणी असे अनेक घृणास्पद घटना घडत असाव्यात यात तिळमात्र शंका नाही. देशातील वाढत्या अत्याचारामुळे व अपहरणाच्या घटनांमुळे समाजातील वातावरण भयभीत झाले असून सर्वसामान्यांनमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.तोच प्रकार भ्रष्टाचाराच्या बाबतीत आपल्याला पाहायला मिळतो. कारण देशातील वाढत्या भ्रष्टाचारामुळे देशात अनेक गंभीर समस्या निर्माण होऊन १४० कोटी जनतेचे वाटोळे होत आहे व आजच्या परिस्थितीत भारत भ्रष्टाचाराच्या बाबतीत जगात अव्वल स्थानावर आहे त्यामुळेच देशात महागाने उच्चांक गाठला आहे. देशातील भ्रष्टाचारी गोरगरीबांचे, शेतकऱ्यांचे, सर्वसामान्यांचे, मजुरांचे रक्त पिऊन आज गडगंज झाले आहेत व आपला संपूर्ण पैसा देश-विदेशात गुंतवून ठेवला आहे.आज मुठभर भ्रष्टाचाऱ्यांमुळे देशांचे संपूर्ण वाटोळे होत आहेत यात सर्वात जास्त राजकीय पुढारी दिसून येतात.आज भ्रष्टाचाराची किड संपूर्ण क्षेत्रात लागलेली दिसून येते यामुळे सर्वसामान्यांचे जगणे अत्यंत अवघड व कठीण झाले आहे. आज देशातील वाढती महागाई, बेरोजगारी, महागडे शिक्षण, महागडी आरोग्य सुविधा, वाढते कुपोषण, भुकमरी या संपूर्ण घटना वाढत्या भ्रष्टाचारामुळे निर्माण झाल्या आहेत आणि याचे प्रायश्चित्त देशाची १४० कोटी जनता आजही भोगत आहे.आज आपण पहातो की, मुठभर भ्रष्टाचारी करोडोंचे भ्रष्टाचार करून आणि त्यांच्या कारणाम्याची हजारो कागदांची फाईल बनुनही निर्दोष सुटतात व हेच भ्रष्टाचारी आज आपल्याला सत्तेमध्ये दिसून येतात. भ्रष्टाचाऱ्यांवर भ्रष्टाचाराच्या अनेक केसेस दाखल असतांना सुध्दा त्यांना अचानक सरकारचा आश्रय मिळतो व सरकारकडून त्यांना क्लीन चिट दिली जाते आणि हेच भ्रष्टाचारी देशाच्या १४० कोटी जनतेला ग्यान पाजतांना दिसतात हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.आज देशात दररोज बलात्काराच्या, मुलींवरील अत्याचाराच्या व अपहरणाच्या महाभयानक घटना दररोज होतांना आपण पहातो.परंतु यांच्यावर कठोर कारवाईचे प्रावधान नसल्याने अनेक गुन्हेगार खुलेआम फिरताना दिसतात व कोर्टामध्ये तारीख पे तारीख असा लपंडाव दिसून येतो.आसाराम बापू ला एक अल्पवयीन मुलीवर बलात्काराच्या आरोपाखाली जोधपुर पुलिस ने ३१ऑगस्ट २०१३ ला इंदौर आश्रम मधुन कैद केले होते तेव्हा पासून तर आज पर्यंत जेलमध्येच आहे परंतु कठोर शिक्षा किंवा फाशीच्या शिक्षेचा काहीही अतापता नाही. त्याचप्रमाणे२०१७ चा उन्नाव बलात्कार प्रकरणातील आरोपी कुलदीप सेंगर याला अजून पर्यंत फाशीची शिक्षा किंवा कठोर शिक्षा ठोठावण्यात आली नाही हेही देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.असे अनेक मोठमोठे दिग्गज देशात आहे की त्यांनी घृणास्पद कृत्य केले आहे परंतु कारवाई मात्र शुन्य आहे.असे अनेक प्रकार देशात घडले आहे व घडत आहे परंतु पिडीतांना अजूनपर्यंत न्याय मिळालेला नाही.उन्नाव बलात्कार प्रकरण जर फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून चालविले असते तर आतापर्यंत कुलदीप सेंगर फासावर लटकला असता. राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की काही लोक सत्तेच्या पडद्याआड अनेक घृणास्पद कृत्य करीत असतात.तेच काम कुलदीप सेंगरने सत्तेमध्ये असतांना २०१७ मध्ये केले. अशाप्रकारे देशात अनेक अत्याचाराच्या घटना आहेत की राजकीय आश्रयामुळे त्यांच्यावर कठोर कारवाई झालीच नाही आणि होणारही नाही.आतातर मुलींवरील व महिलांवरील अत्याचारांच्या बाबतीत भोंदूबाबांनी कळस गाठल्याचे दिसून येते दररोजच्या वृत्तपत्रात व मिडियाच्या माध्यमातून घृणास्पद प्रकरण उघडकीस येत आहे.त्यामुळे आता देशात वाढते अत्याचार पहाता; पोलिस विभागाला खुली सुट देऊन त्यांचा एन्काऊंटर किंवा फासावर लटकविने हाच पर्याय सरकारने स्वीकारला पाहिजे. आजही अनेक भोंदूबाबा व कूलदिप सेंगर सारखे अनेक राजकीय पुढारी राजकीय आश्रयाखाली जेलमध्ये शाही जिंदगी जगत आहे. परंतु त्यांना अजुनपर्यंत फाशीची शिक्षा किंवा कठोर शिक्षा ठोठावण्यात आली नाही हेही भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.या कारणांमुळेच देशात मुलींवरील व महिलांवरील अत्याचारामध्ये मोठ्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ झाल्याचे दिसून येते. बलात्कारी आणि भ्रष्टाचारी यांच्यात यत्किंचितही फरक नाही कारण बलात्कारी हा संपूर्ण समाजाला कलंकित करून १४० कोटी जनतेवर आघात करतो;तर भ्रष्टाचारी हा भ्रष्टाचाराच्या माध्यमातून करोडोंची संपत्ती देश-विदेशात जमा करून १४० कोटी जनतेचे कळतनकळत रक्त पित असतो व संपूर्ण समाज व्यवस्थेला आर्थिक नुकसान पोहचवुन पोखरत असतो.देशात शक्ती कायद्यात गुन्हेगाराला २१ दिवसांत फाशी देण्याची तरतूद आहे.मात्र दुदैर्वाने हा कायदा केंद्राकडे अंतिम मंजुरीसाठी प्रलंबित असल्याचे सांगितले जाते.आज शक्ती कायदा राज्यासह देशात लागू असता तर उन्नाव बलात्कार प्रकरणातील आरोपीं कुलदीप सेंगर किंवा नसरापूरच्या नराधमाला किंवा अन्य बलात्काऱ्याला २१ दिवसांत फाशीची शिक्षा झाली असती आणि अशा गंभीर गुन्हेगारांवर कायद्याचा धाक बसला असता. परंतु देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की असा कायदा अमलात आणण्यासाठी राजकीय पुढारीच हिचकीचावतात. त्यामुळे आज बलात्कार प्रकरणातील भोंदूबाबा,कुलदिप सेंगर सारखे अनेक राजकीय पुढारी व बाहुबली हे राजकीय आश्रयाने जेलमध्ये शाही जिंदगी जगत आहे .यांना तर फाशीची शिक्षा व्हायला पाहिजे होती परंतु हे देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.आज देशात वाढते अत्याचार व भ्रष्टाचार पहाता यांच्यासाठी फक्त फाशीच्याच शिक्षेचे प्रावधान असायला हवे.कारण या दोन्ही घटना समाजाला लागलेली किड आहे.यावर नियंत्रण तेंव्हाच संभव आहे की, अशा अट्टल गुन्हेगारांना फाशीची शिक्षा जोपर्यंत होत नाही तोपर्यंत यात सुधारणा शक्य नाही.अट्टल गुन्हेगार,बलात्कारी,भ्रष्टाचारी, विविध गुन्हेगार अशा कैद्यांना सुधारण्याची संधी म्हणून कुटुंबातील व्यक्तीचे आजारपण,विवाह किंवा मृत्यू प्रसंगी पॅरोल किंवा फर्लो देण्याची तरतूद देशाच्या अनेक राज्यात आहे. परंतु देशातील अनेक राज्यांतील कैदी पॅरोल किंवा फर्लो वर असणारे अनेक कैदी अजुनही फरार असल्याचे सांगितले जाते.परंतु मी म्हणतो की, अशा अट्टल गुन्हेगारांना पॅरोल किंवा फर्लो का म्हणून द्यायचा? ज्यांना गुन्हा करतांना समाजाची किंवा देशाच्या जनतेचा आत्मा दुःखावण्याची थोडीशीही जाणीव नाही किंवा लाज वाटत नाही अशांना का म्हणून मोकळीक द्यायची!त्यामुळे वाढत्या भयावह घटना व मुलींवरील अत्याचार पहाता अट्टल गुन्हेगारांना सजा-ए-मौत हीच एकमेव सजा असायला हवी.देशात लैंगिक अत्याचार, बलात्कारी, अट्टल गुन्हेगार यापेक्षा सर्वात मोठे गुन्हे देशात घर करून बसले आहेत ते गुन्हेगार म्हणजे ह्यभ्रष्टाचारीह्व आज देशाला व देशाच्या १४० कोटी जनतेला मुठभर भ्रष्टाचाऱ्यांनी पोखरून टाकले आहे.

आज देशात भ्रष्टाचार येवढा उफाळलेला आहे की गरीब व सर्वसामान्यांचे रक्त पित आहे.त्यामुळे यांचा एन्काऊंटर होने किंवा फासावर लटकविले अत्यंत गरजेचे आहे यासाठी पोलीस विभागाला मोकळीक असने आवश्यक आहे.देशात भ्रष्टाचाराची जळे-मुळे सर्वात जास्त राजकीय वतुर्ळात मोठ्या प्रमाणात दिसून येतात. त्यामुळे पोलिस विभागाला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांच्या केसालाही धक्का लागत नाही व कायद्याच्या चाकोरीतून तारीख पे तारीख असा लपंडाव सुरू रहाते व कालांतराने सुटका होते.यालाही आश्चर्यच म्हणावे लागेल. आज भ्रष्टाचारी करोडो,अरबो रुपए घेऊन देशांच्या बाहेर फरार होतात आणि झाले आहेत.परंतु आपण काहीच करू शकत नाही व हातावर हात ठेवून बसुन राहातो. ही सुद्धा आपली शोकांतिका म्हणावी लागेल. मी केंद्र सरकारला व देशातील संपूर्ण राज्य सरकारांना विनंती करतो की, लैंगिक अत्याचार, मुलींचे आणि महिलांचे अपहरण करणारी टोळी व भ्रष्टाचारी यावर आळा घालण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून किंवा शक्ती कायद्याच्या माध्यमातून गुन्हेगारांना फासावर लटकविले पाहिजे.

समर्पण, परिश्रम आणि नियोजनाचा विजय

आधुनिक युगात निवडणुका लढविणे आणि त्यात यश मिळवणे याचे व्यवस्थापन शास्त्र तयार झाले आहे. या शास्त्राला अनेक पैलू आहेत. बूथ पातळीवरची पन्ना समिती हा भाजपच्या निवडणूक रणनीतीचा प्रमुख भाग आहे. मात्र भाजपचे हे यश अनेकांना पचत नाही.पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने मिळवलेला दणदणीत विजय अनेकांना पचलेला नाही. ११ वर्षे मुख्यमंत्री असूनही स्वतःचा विधानसभा मतदारसंघही सांभाळू न शकलेल्या ममता बॅनर्जी, ह्यथोर विचारवंतह्व राहुल गांधी यांनी या विजयाबद्दल शंका उपस्थित करणे अपेक्षितच होते. मात्र अनेक ज्येष्ठ पत्रकार, विचारवंत यांनाही भारतीय जनता पक्षाचे हे निर्भेळ यश भाजपला असलेल्या तीव्र विरोधामुळे पचवता येईनासे झाले आहे. काही ज्येष्ठ पत्रकारांना या विजयामागे ह्यगौडबंगालह्व असल्याची शंका येते आहे. अशा मंडळींना ममता बॅनर्जी आणि त्यांचा पक्ष कधीच पराभूत होऊ नये, अशी इच्छा असल्याने त्या इच्छेपोटीच या मंडळींनी वस्तुस्थितीपासून दूर पळण्याचा मार्ग पत्करला आहे. आधुनिक युगात निवडणुका लढविणे आणि त्यात यश मिळवणे याचे व्यवस्थापन शास्त्र तयार झाले आहे. या शास्त्राला अनेक पैलू आहेत. या शास्त्राचा पहिला प्रयोग अरविंद केजरीवालांनी यशस्वीरीत्या सादर केला. २०१३ मध्ये पहिल्यांदाच निवडणूक लढविणाऱ्या केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दिल्ली विधानसभा निवडणुकीत बहुमताजवळ जाण्याची कामगिरी केली. २०१५ मध्ये विधानसभा निवडणुकीत ७० पैकी ६७ जागा जिंकत विक्रमी यश मिळवले. तोपर्यंत आणि आजपर्यंतही भारतीय राजकारणात एवढे मोठे यश कोणी मिळवले नाही. मतदारांचा डेटाबेस तयार करणे, त्यांच्या अपेक्षा-गरजा जाणून घेऊन त्यानुसार रणनीती आखणे, समाजमाध्यमांचा वापर करून आपली विचारसरणी निर्धारित केलेल्या मतदारांपर्यंत पोहचवणे, असे हे केजरीवालांचे निवडणुकीचे आधुनिक व्यवस्थापन शास्त्र होते. गेल्या १०-११ वर्षांत निवडणुकीच्या या व्यवस्थापन शास्त्रात कालानुरूप अनेक बदल झाले आहेत. प्रशांत किशोर हे याच निवडणूक शास्त्राचे कुलगुरू मानले जातात. केजरीवाल यांनी २०१५ आणि २०२० मध्ये दिल्ली विधानसभा निवडणुकीत प्रचंड विजय मिळवला तरी त्यांच्या विजयावर पत्रकार, विचारवंतांनी शंका घेतली नव्हती. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने दिल्लीतील सातही जागा प्रचंड मताधिक्याने जिंकल्या होत्या. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर सहाच महिन्यांनी दिल्ली विधानसभेच्या निवडणुका झाल्या. मात्र विधानसभा निवडणुकीत मतदारांनी आम आदमी पक्षाला मोठा जनादेश दिला. त्यावेळी भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाने हा जनादेश नाकारला नाही.ह्यआपह्वच्या नेतृत्वाने मतदारांशी संपर्क साधण्याचे अत्याधुनिक तंत्र प्रत्यक्ष अवलंबिताना वीज-पाणी बिल माफ, मोहल्ला दवाखाने, सरकारी शाळांचा दर्जा सुधारणे यासारखे लोकोपयोगी कार्यक्रम मतदारांपुढे ठेवले. निवडणुका लढविण्याचे आणि जिंकण्याचे हे तंत्र भाजप विरोधकांनी अवलंबले तर विचारवंत आणि पत्रकारांना त्या विजयात कोणतेही गौडबंगाल वाटत नाही. क्रिकेटमध्ये प्रतिस्पर्धी फलंदाजांच्या कमकुवत बाजूंचा अभ्यास करण्यासाठी त्या फलंदाजांच्या पूर्वीच्या सामन्यातील चित्रफितीचा अभ्यास केला जातो. त्याचप्रमाणे वारंवार यशस्वी ठरणाऱ्या गोलंदाजाच्या शैलीचाही अभ्यास केला जातो. निवडणुकीच्या खेळातही विरोधी पक्षांच्या कमकुवत बाजूंचा अभ्यास केला जातो. विरोधी पक्ष जर सत्तेत असेल तर त्या सरकारविरोधातील मुद्दे जनमताचा अंदाज घेऊन शोधले जातात. त्यानुसार निवडणूक प्रचारात कोणत्या मुद्द्यांवर भर दिला पाहिजे, जाहीरनाम्यात कोणत्या मुद्द्यांचा समावेश केला पाहिजे, प्रमुख नेत्यांनी भाषणांमध्ये कोणत्या मुद्द्यांवर बोलले पाहिजे, अशा अनेक गोष्टींचे आकलन होऊ शकते. पूर्वी पक्ष आणि नेत्याच्या वैयक्तिक लोकप्रियतेच्या बळावर निवडणुका जिंकल्या जात होत्या. २१ व्या शतकात मतदार पूर्वीप्रमाणे भाबडा राहिलेला नाही.भारतीय जनता पक्ष संघटना सर्वतोपरी हा विचार प्रत्यक्षात आणणारा पक्ष आहे. बूथ पातळीवरची पन्ना समिती हा भाजपच्या निवडणूक रणनीतीचा प्रमुख भाग आहे. २०२१ मध्ये भाजपने प्रथमच पश्चिम बंगालमध्ये सर्व ताकदीनिशी निवडणुका लढविल्या होत्या. तोपर्यंत जनसंघ आणि भारतीय जनता पक्षाचे पश्चिम बंगालमधील अस्तित्व नाममात्रच होते. भाजपचे संघटन २०२१ मध्ये बूथपातळीपर्यंत पोहचले नव्हते. असे असतानाही २०२१ च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने ३८ टक्के मते मिळवली होती. ममता बॅनर्जींच्या पक्षाने २०२१ मध्ये ४८ टक्के मते मिळवली होती. बूथपातळीपर्यंत ताकदवान असलेली तृणमूलची मनगटशाही हा खुल्या वातावरणात निवडणुका होण्यातील प्रमुख अडथळा होता. तृणमूलचे गावपातळीवरील कार्यकर्ते मतदारांना मतदानापासून प्रतिबंध करीत असत. शहरी भागातही असेच चित्र होते. निवडणूक आयोगाने निर्भय वातावरणात मतदान व्हावे यासाठी केंद्रीय राखीव पोलीस दलाचे सुमारे अडीच लाख जवान बंदोबस्तासाठी ठेवले होते. तृणमूलच्या कार्यकर्त्यांची प्रचंड दहशत केंद्रीय पोलीस दलाच्या बंदोबस्तामुळे कमी झाली. ९२ टक्क्यांपर्यंत झालेले विक्रमी मतदान हे त्याचेच द्योतक आहे. शहरी व निमशहरी भागात मोठ्या गृहनिर्माण संस्थांच्या आवारातच मतदान केंद्र सुरू करण्यामुळे मतदारांना निर्भयपणे मतदान करता आले. पडद्यामागच्या रणनीतीत प्रत्येक बूथवर कार्यकर्त्यांची फळी उभी करणे, पक्षाचे हक्काचे मतदान सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत करून घेणे, व्हॉट्सॅप ग्रुपद्वारे तृणमूल सरकारविरोधातील मुद्द्यांचा प्रसार करणे याचा समावेश होता. भाजप कार्यकर्त्यांच्या मदतीला विचार परिवारातील अनेक संघटनांचे कार्यकर्ते होते. तृणमूलच्या १५ वर्षांच्या राजवटीत बांगलादेशींच्या अनुनयामुळे निर्माण झालेला असंतोष आणि त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेपुढे उभे ठाकलेले गंभीर आव्हान पाहून विचार परिवाराने आपली सारी ताकद तृणमूलच्या विरोधात मैदानात लावली होती. घुसखोरांची नावे वगळली गेल्यानंतर ममतांनी आकांडतांडव केला. मात्र या घुसखोरांच्या भारतीय नागरिकत्वाचे पुरावे कोणालाच सादर करता आले नाहीत. ज्या मतदारसंघात ह्यएसआयआरह्वमुळे मतदारांची नावे मोठ्या प्रमाणात वगळली गेली त्या २० मतदारसंघांपैकी १३ मतदारसंघांत तृणमूल काँग्रेसने विजय मिळवला आहे. निवडणूक आयोगावर आगपाखड करणाऱ्या ममतांनी या आकडेवारीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. समशेरगंज, लालगोला, भगवानगोला, रघुनाथगंज, मेतियाबुर्ज, सुटी, मोतआभारी, गोलपोखर, मालातीपूर, छोप्रा, सुजापूर, राजरथ, बशीरहट अशा मतदारसंघात आठ हजारांपासून ८० हजारांपर्यंत मतदार वगळले गेले. तरीही तृणमूल काँग्रेसचा या १३ मतदारसंघांमध्ये मोठ्या मताधिक्याने विजय झाला. मोठ्या सभाऐवजी नुक्कड सभांवर भर देऊन अधिकाधिक स्थानिक नेतृत्वाला मतदारांपर्यंत पोहचवण्याची भाजप नेतृत्वाची योजना होती. २०२४ मध्ये वैद्यकीय महाविद्यालयात झालेल्या बलात्काराच्या घटनेमुळे ममता सरकारचा बुरखा पूर्णपणे फाटला. या घटनेमुळे महिला आणि नव मतदारांमध्ये निर्माण झालेला असंतोष तृणमूलच्या मोठ्या पराभवात परिवर्तित झाला. ममतांच्या गैरकारभाराचे मुद्दे सातत्याने जनतेच्या मनावर बिंबवण्यात आले. या साऱ्याचा एकत्रित परिणाम भाजपच्या विजयात झाला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे १५ दिवस पश्चिम बंगालमध्ये ठाण मांडून होते. सातत्याने बूथपातळीच्या कार्यकर्त्यांपर्यंत अमित शहा संपर्क साधत होते. वॉररूममध्ये बसून पक्षाच्या प्रचाराचा आढावा घेत होते. अशा अनेक छोट्या-मोठ्या गोष्टींमुळे तृणमूलच्या दडपशाहीविरुद्ध वातावरण तयार होत गेले. या सर्व गोष्टींची जाणीव भाजपविरोधी पत्रकारांना, विचारवंतांना नक्कीच असते. मात्र त्यांना भाजपचा विजय कधीच होऊ नये, असे सातत्याने वाटत असल्यामुळे भाजपचा विजय मोकळ्या मनाने स्वीकारण्याची त्यांची तयारी नसते.

वंदे मातरमचा व्यापक विचार व्हावा

बंकिमचंद्र चटर्जी यांचे वंदे मातरम हे राष्ट्रीय गीत आहे, परंतु त्याला जन गण मन सारखा राष्ट्रगीता चा दर्जा नाही. केंद्रातील मोदी सरकार या राष्ट्रीय गीता ला राष्ट्रगीता सारखाच दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न करत आहे, त्याच मोदी सरकारचे कायम विरोधक असलेल्या काँग्रेसच्या पक्षाच्या अधिवेशनात वंदे मातरम अधिकृतरित्या पहिल्यांदा गायले गेले होते. वंदेमातरम आणि जनगणमन यांची भारतासाठी उपलब्ध झाली ती बंगालच्या संस्कृतीतूनच, बंकिमचंद्र चटर्जी आणि रवींद्रनाथ टागोर या दोन्ही महनीय व्यक्तीमत्वांची कर्मभूमी बंगालच राहिली आहे. मात्र बंगालमध्ये या दोन्ही गीतांच्या मुद्द्यावरून कधी वाद झाल्याचा इतिहास नाही. मग आताच वंदे मातरमच्या विषयावरून विवादाची गरज का पडली असावी? देशातील राष्ट्रीय प्रतीके, गीतांचा राजकीय वापर करण्यात सत्ताधारी वाकबगार आहेत. सुरुवातीला राष्ट्रीय मुद्रा असलेल्या अशोक स्तंभावरील तीन सिंहांना आक्रमकतेने सादर करण्यात आले. त्यानंतर सभागृहातील सेंगोल मध्ये झालेला बदल आणि आता राष्ट्रगीताच्या बरोबरीने राष्ट्रीय गीताला उभे करण्यामागील केंद्राच्या सत्ताधार्यांचा राजकीय हेतू लपून राहिलेला नाही. वंदे मातरम हे गीत देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या प्रेरणेचे गीत असल्याने त्याचा थेट ठळक संबंध काँग्रेसच्या इतिहासाशी राहिला आहे, सत्ताधार्यांच्या सांस्कृतिक इतिहासाशी नाही. वंदे मातरम या गीताला राष्ट्रगीतासमान दर्जा मिळाल्यास कायद्यानुसार हे गीतही नागरिकांसाठी बंधनकारक होईल, अर्थातच या वंदे मातरमला देशातील काही मुस्लीम गटांचा विरोध असल्याने त्याआडून अल्पसंख्याकांना नामोहरम करण्याची केंद्राची ही खेळी आहे का, असा प्रश्न निर्माण व्हावा. देशाच्या सांस्कृतिक प्रतिकांमध्ये बदल करून केंद्राला काय साध्य करायचे आहे? महाराष्ट्रातही वारकरी सांप्रदायाच्या जय श्री रामकृष्ण हरी, पांडुरंग माऊली किंवा ग्रामीण भागात सामान्यपणे अभिवादन करण्यासाठी बोलल्या जाणारा राम राम या संबोधनासामोर जय श्रीरामची आक्रमक घोषणा उभी करण्याचा प्रयत्न करण्यामागील कारणे काय आहेत? वंदे मातरम या गीताचा अर्थ भारत मातेला वंदन अशा अथार्ने कडव्या एकेश्वरवादी समुहांना अडचणीचा ठरणार आहे. त्यामुळे त्यातून आपले धार्मिक विरोधाचे राजकारण पुढे रेटण्याचा हा प्रयत्न स्पष्ट आहे. या मुद्द्यावर केंद्रातील सभागृहात याआधीही समर्थक आणि विरोधकांमध्ये वाद झाल्याचे स्पष्ट झाले आहे. काही काळापूर्वी लेखक जावेद अख्तर यांच्यासारख्या मंडळींनी केंद्रीय सभागृहात भारत माता की जय या घोषणेचे जोरदार समर्थन केले होते. या घोषणेला विरोध करणाऱ्या कडव्या स्व-धर्मवाद्यांसोबतच या मुद्द्याचे राजकारण करणाऱ्या सत्ताधार्यांनाही त्यांनी खडे बोल सुनावले होते. भारत माता की जय या ओळींमध्ये या देशाला माता अर्थात आई संबोधून तिच्या विजयाची घोषणा करण्यात काही गैर नसल्याचे त्यांचे म्हणणे होते. या विधानाचा शब्दार्थ लक्षात घेतल्यास त्याला वस्तुतः विरोध करण्याचे काही कारण नव्हते. परंतु त्यावरूनही देशातील दोन कट्टरवादी गटांमध्ये गैरसमज निर्माण करून विरोधाचे राजकारण धार्मिक ध्रुवीकरणासाठी खेळले गेले होते. आता वंदे मातरमच्या मुद्द्यावरूनही तसेच होत आहे. वंदे मातरम या घोषणेत भारत मातेला वंदन असा अर्थ काढल्यास तसेच वंदनेचा एका अथार्ने पूजा उपासना किंवा इबादत किंवा सजदा असा इस्लाममधील मूळ अरबी शब्दांचा अर्थ घेतल्यास एकाच परमेश्वराची उपासना त्यासमोरच नतमस्तक होर्णाया विचारसरणीसाठी अशी वंदे मातरमची घोषणा अडचणीची होऊ शकते. हे केंद्रातील सत्ताधार्यांना पुरते ज्ञात आहे. यातून देशातील मुस्लिमांची कोंडी करण्याचा हा सत्ताधारी विचारसरणीचा प्रयत्न असावा. तर कडव्या मुस्लीम विचारसरणीनेही वंदन या शब्दाचा अर्थ सजदा असा घेतल्यास त्यातून दोन्हीकडील परस्पविरोधी धर्मवादी राजकारणाला बळच मिळेल, हे स्पष्ट आहे.

वंदे मातरमला राष्ट्रगीत समकक्ष दर्जा मिळाल्यास इतर धर्मवाद्यांनाही वंदे मातरम कायद्यानुसार बोलावेच लागेल, असा बळजबरी प्रयत्न केंद्राचा आहे. बरं जी मंडळी आज वंदे मातरमची एवढी भलामण करत आहेत, त्यांचे देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाच्या मुद्द्यावर वारंवार ऐतिहासिक तथ्यांद्वारे आक्षेप घेतले गेले आहेत. आम्ही सांगू तोच धर्म, तीच उपासना, तेच राष्ट्रप्रेम, तीच देशनिष्ठा अशी प्रमाणपत्रे वाटण्याचे अधिकार सत्ताधार्यांना कोणी दिले आहेत? सत्ता म्हणजे देश, राष्ट्र आणि धर्म आणि संविधानही नव्हे, हे या मंडळींना सांगण्याची गरज आहे. देशातील नागरिकांना प्रतीके, संबोधने, वक्तव्ये, गीतांच्या भावनिक राजकारणात अडकवून ठेवण्यापेक्षा त्यांच्या विवंचना आणि त्यांचे जगणे सुसह्य करण्याठी बरेच काही करता येऊ शकते, ज्यासाठी सत्ताधार्यांना नागरिकांनी निवडून दिले आहे. देशातील नागरिकांना अर्थात भारत मातेच्या मुलांना अडचणीत, दुःखात ठेवून स्वतःच्या नावाचा जयजयकार करणे किंवा स्वतःला वंदन करवून घेणे भारतमातेलाही पटणारे नाही. अगर इस देश मे रहना होगा, तो वंदेमातरम कहना होगा, ही हिंदुत्ववादी विचारसरणीच्या लोकांची घोषणा तर प्रसिद्धच आहेच. त्याचा निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळीही वापर करण्यात आला. आता सत्तेचा प्रभाव वाढल्यामुळे काहीही करून वंदेमातरम मुसलमानांना बोलायला भाग पाडण्याइतपत त्याचा जोश राहू नये. त्याचा अधिक व्यापक विचार करून भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात जे शहीद झाले त्यात अनेक मुसलमान क्रांतिकारक होते, त्यांचाही विसर पडू देता कामा नये.

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार,२६ मे २०२६ ते ०१ जुन २०२६

वर्ष २०३०-३१ पर्यंत नवीन फार्मसी अभ्यासक्रमांना स्थगिती

मुंबई, राज्यातील औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) संस्थांची वाढती संख्या आणि त्या तुलनेत गुणवत्तेचा प्रश्न विचारात घेता, राज्य सरकारने एक मोठा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. शैक्षणिक वर्ष २०३०-३१ पर्यंत राज्यात नवीन 'बी.फार्म' आणि 'डी.फार्म' महाविद्यालयांना परवानगी दिली जाणार नाही. मात्र, दुसरीकडे आदिवासी आणि डोंगराळ जिल्ह्यांमध्ये उच्च शिक्षणाची दरी सांधण्यासाठी १७ नवीन व्यावसायिक महाविद्यालये सुरू करण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली आहे.

मंत्रालयात गुरुवारी आयोजित 'महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग' (माहेड) च्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार आणि उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यात सध्या फार्मसी महाविद्यालयांचा पूर आला असून, अनेक ठिकाणी पायाभूत सुविधांचा अभाव असल्याचे चित्र आहे. हे लक्षात घेऊन २०२७-२८ ते २०३०-३१ या कालावधीत नवीन संस्थांना बंदी घालण्यासोबतच विद्यमान महाविद्यालयांमधील प्रवेशक्षमता वाढविण्यासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी मनाई केली आहे. या निर्णयाची अधिकृत माहिती केंद्र सरकार आणि 'फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया'ला



कळविण्याचे निर्देशही त्यांनी दिले. दुर्गम जिल्ह्यांसाठी 'बृहत आराखडा' मंजूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचा (लोणेरे) २०२५ ते २०३१ या कालावधीचा बृहत आराखडा बैठकीत मंजूर करण्यात आला. या आराखड्यानुसार गडचिरोली, नंदुरबार, हिंगोली, वाशिम, धाराशिव, सिंधुदुर्ग आणि परभणी या सात मागास व डोंगराळ जिल्ह्यांमध्ये अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, एचएमसीटी आणि 'बी.व्होक' यांसारखे व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणारी १७ नवीन महाविद्यालये प्राधान्याने सुरू केली जाणार आहेत.

शिक्षणातून 'टॅलेंट कॅपिटल' निर्मिती

उच्च शिक्षणात केवळ पदव्या देण्यापेक्षा विद्यार्थ्यांना उद्योगस्नेही कौशल्ये देणे आवश्यक आहे. 'ह्यूमन कॅपिटल'कडून 'टॅलेंट कॅपिटल'कडे जाण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे मत मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले. या बैठकीत 'रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठा'चा बृहत आराखडाही मंजूर करण्यात आला. नव्या धोरणानुसार पारंपरिक महाविद्यालयांमध्ये आता 'समाजकार्य' ही स्वतंत्र विद्याशाखा सुरू करून बहुविद्याशाखीय शिक्षणाला वाव दिला जाणार आहे.

सिंधुदुर्गमध्ये 'हॉटेल मॅनेजमेंट'ला मान्यता

सिंधुदुर्ग जिल्ह्याचा पर्यटन जिल्हा म्हणून होणारा विस्तार लक्षात घेऊन, राज्य सरकारने येथे रोजगाराभिमुख शिक्षणावर भर दिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या (लोणेरे) नवीन बृहत आराखड्यानुसार, सिंधुदुर्ग आणि नंदुरबार जिल्ह्यांत 'हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी' अभ्यासक्रमाची नवीन महाविद्यालये सुरू करण्यास प्राधान्याने मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील तरुणांना स्थानिक पातळीवरच जागतिक दर्जाचे आदरातिथ्य क्षेत्रातील शिक्षण उपलब्ध होणार असून, पर्यटन उद्योगासाठी लागणारे कुशल मनुष्यबळ जिल्ह्यातच तयार होण्यास मदत होईल.

दुधाच्या किंमती वाढणार



मुंबई। देशातील दुग्ध क्षेत्रातील अग्रगण्य संस्था असलेल्या गुजरात को-ऑपरेटिव्ह मिल्क मार्केटिंग फेडरेशनने अमूल ब्रँड अंतर्गत विक्री होर्णाया दुधाच्या किमतीत देशभरात प्रति लिटर २ रुपयांची वाढ करण्याची घोषणा केली आहे. ही दरवाढ गुरुवारपासून, म्हणजेच १४ मे २०२६ पासून लागू होणार आहे. अमूलने दिलेल्या अधिकृत पत्रकानुसार, ताज्या दुधाच्या पिशव्यांमधील सर्व प्रमुख प्रकारांमध्ये जसे की, अमूल ताजा, अमूल गोल्ड, अमूल शक्ती ही वाढ करण्यात आली आहे. फेडरेशनने स्पष्ट केले आहे की, ही दरवाढ साधारणपणे २.५ ते ३.५ टक्क्यांच्या दरम्यान आहे. याआधी अमूलने १ मे २०२५ रोजी दुधाचे दर वाढवले होते. उत्पादनावरील वाढता खर्च हे मुख्य कारण असल्याचे जीसीएमएमएफने म्हटले आहे. गेल्या वर्षभरात अनेक बाबी महागल्याने ही दरवाढ अनिवार्य झाली होती.

जनावरांच्या खाद्याच्या दरात लक्षणीय वाढ झाल्याने दुग्धोत्पादन खर्च वाढला आहे. दूध भरण्यासाठी वापरल्या जार्णाया प्लास्टिक फिल्मच्या किमतीतही वाढ झाली आहे. इंधनाचे दर वाढल्यामुळे दुधाच्या वाहतुकीचा खर्च वाढला.त्याचा परिणाम दरांवर झाल्याचे समोर आले आहे.

सराईत गुन्हेगाराला गावठी पिस्टलसह अटक

ठाणे । बेकायदा प्राणघातक शस्त्र बाळगणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला ठाणे गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथकाने अटक करत मोठी कारवाई केली आहे. आरोपीकडून एक गावठी पिस्टल आणि एक जिवंत काडतूस जप्त केले आहे. ठाणे न्यायालयाने आरोपीला 12 मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. मोगेश म्हात्रे (32) असे आरोपीचे नाव असून तो भिवंडी तालुक्यातील काल्हेर परिसरात राहणार आहे. त्याच्याविरोधात नारपोली पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हाही दाखल असल्याचे समोर आले आहे. ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ-5 अंतर्गत येणाऱ्या कापूरबावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत फरारी तसेच पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगारांच्या शोधासाठी विशेष मोहीम राबवण्यात येत होती. काल्हेर ते ठाणे सार्वजनिक मार्गावरील न्यू कशेळी ब्रिज परिसरात सुरू असलेल्या तपासणीदरम्यान मोगेश सुनील म्हात्रे हा पोलिसांच्या जाळ्यात अडकला. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एक गावठी पिस्टल आणि एक जिवंत काडतूस सापडले. त्याला 8 मे रोजी अटक करण्यात आली असून त्याच्याविरोधात कापूरबावडी पोलीस ठाण्यात बेकायदेशीर प्राणघातक शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नराधम बापाकडून दोन्ही लेकींवर लैंगिक अत्याचार; बाप लेकीच्या नात्याला काळीमा

कल्याण। डोंबिवली शहरात बाप-लेकीच्या नात्याला काळीमा फासणारी घटना समोर आल्याने संपूर्ण शहरभरातून संताप व्यक्त करण्यात येत आहे. एका वासनांध बापाने त्याच्या दोन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याची अत्यंत लाजीरवाणी घटना समोर आली आहे. याप्रकरणी मानपाडा पोलिसांनी गुन्हा दाखल करत या 45 वर्षीय नराधमाला अटक केली आहे. दरम्यान या प्रकरणी तिच्या आईची भूमिका काय होती? तिने विरोध केला होता का? याचा तपास आता पोलीस करत आहेत.



डोंबिवली पूवेर्तील मानपाडा परिसरात राहणाऱ्या या बापाला दोन मुली आहेत. तो कोणताही काम धंदा करत नाही तर त्याची पत्नी काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहे. कामानिमित्त त्या व्यक्तीची पत्नी बाहेर असल्याने या संधीचा फायदा घेऊन हा विकृत बाप त्याच्या १९ वर्षे मोठ्या मुलीवर काही महिन्यांपासून लैंगिक अत्याचार करत होता.

मात्र घाबरलेल्या मुलीने आईला अथवा कोणालाही ही माहिती सांगितली नाही. त्यामुळे त्या विकृत बापाची हिंमत अधिक वाढली. बापाकडून होणारा लैंगिक अत्याचार ही मुलगी अनेक महिन्यांपासून सहन करत होती. त्यानंतर या नराधमाची मजल आणखीन वाढली आणि त्याने त्याच्या १० वर्षांच्या मुलीवरही लैंगिक अत्याचार केला. हा प्रकार लक्षात येताच मोठ्या मुलीने या विरोधात आवाज उठवत आईला घडलेला सगळा प्रकार सांगितला.

हे ऐकून आईच्या पायाखालची वाळू सरकली. त्यानंतर तिने लागलीच मानपाडा पोलीस ठाण्यात धाव घेऊन नराधम आणि विकृत पतीविरोधात तक्रार केली. पोलिसांनी तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेत गुन्हा दाखल केला आणि लगेचच आरोपी बापाला अटक केली.

मुंबईत पोलिसांची मोठी कारवाई; दोन वेगवेगळ्या गुन्ह्यात 12 जणांना अटक, 16 कोटींचे ड्रग्ज जप्त

मुंबई, अँटी नार्कोटिक्स सेलच्या कांदिवली युनिटने अंधेरी पश्चिमेतील वसोर्वा परिसरातील यारी रोडजवळ छापा टाकत मोठी ड्रग्ज कारवाई केली आहे. या कारवाईदरम्यान पोलिसांनी दोन आरोपींकडून 765 ग्रॅम हेरॉईन जप्त केले असून, आंतरराष्ट्रीय बाजारात या अमली पदाथार्ची किंमत सुमारे 3.82 कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. दुसरीकडे ठाणे जिल्ह्यातील मीरा रोड परिसरात व्यावसायिक स्वरुपात एमडी ड्रग्सची खरेदी-विक्री करणाऱ्या मोठ्या अंमली पदार्थ रॅकेटचा गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष-4 ने पदार्फाश केला आहे. या कारवाईत तब्बल 13 कोटी 61 लाख 38 हजार 480 रुपये किंमतीचा एमडी ड्रग्स जप्त करण्यात आले. याप्रकरणात 10 आरोपींना अटक करण्यात आली आहे. कांदिवली ड्रग्स प्रकरणातपोलिसांनी दोन्ही आरोपींना ताब्यात घेत पुढील तपास सुरू केला आहे.



मिरा रोड प्रकरणी 10 आरोपींना अटक

मिरा रोड प्रकरणात पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, 4 एप्रिल 2026 रोजी मिरा रोड पूर्व येथील छेडा आदर्श बिल्डिंग परिसरातील एका घरावर छापा टाकण्यात आला. या कारवाईदरम्यान श्रीमती फिरदोस अरबाज कुरेशी यांच्या घरातून 1 किलो 324 ग्रॅम वजनाचा अंदाजे 2 कोटी 66 लाख 17 हजार 280 रुपये किंमतीचा एमडी ड्रग्स जप्त करण्यात आला. तपासात हा अंमली पदार्थ तिचा पती अरबाज वकील कुरेशी याचा असल्याचे निष्पन्न झाले.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, या प्रकरणात ड्रग्ज पुरवठा साखळीशी संबंधित इतर व्यक्तींचाही शोध घेतला जात आहे. याप्रकरणी नयानगर पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधीद्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम 1985 अंतर्गत कलम 8(क), 21 (क), 22(क) आणि 29 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष-4 ने तपासाची सूत्रे हाती घेत मुंबई, मिरा रोड आणि गुजरात येथे धडक कारवाया करत एकामागोमाग एक अशा 10 आरोपींना अटक केली. आरोपींकडून एकूण 6 किलो 773 ग्रॅम वजनाचा एमडी ड्रग्स जप्त करण्यात आला असून त्याची बाजारातील किंमत 13 कोटींहून अधिक असल्याचे पोलिसांनी सांगितले. त्याच बरोबर एम.डी. ड्रग्ज तयार करण्यासाठी लागणारी 255 लिटर ची रसायने ही हस्तगत करण्यात आली आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये अरबाज कुरेशी, मोईज खान, अरमान राईन, सुनिल यादव, मोहम्मद वसिम शेख, इरफान कुडीया, मोहम्मद अराफत अन्सारी, खालदा अन्सारी आणि आकाश यादव यांचा समावेश आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त निकेत कौशिक, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलीस उपआयुक्त संदीप डोईफोडे आणि सहायक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष-४ चे प्रभारी पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख आणि त्यांच्या पथकाने ही धडाकेबाज कारवाई यशस्वी केली.

निदा खानने पीडितेला काय-काय पाठवलं? घरी जाऊन धार्मिक विधी, नावही बदलण्याचा कट; मतीन पटेल अन मावशीचं नाव पुढे, तपासात चक्रावणारी माहिती

नाशिक। निदा खानने पीडितेला काय-काय पाठवलं? घरी जाऊन धार्मिक विधी, नावही बदलण्याचा कट; मतीन पटेल अन मावशीचं नाव पुढे, तपासात चक्रावणारी माहिती नाशिकमधील बहुराष्ट्रीय कंपनीत काम करणाऱ्या तरुणीवर अत्याचार करून तिचे धर्मांतर करण्याचा प्रयत्न करणाऱ्या टोळीतील मुख्य संशयित निदा खान हिची विशेष तपास पथकाने कसून चौकशी सुरू केली आहे. या चौकशीत अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक बाबी समोर येत आहेत. निदाने केवळ पीडितेचे मतपरिवर्तन केले नाही, तर तिच्या घरात जाऊन स्वतःच्या धमार्चे विधी केल्याचे आणि पीडितेला विशिष्ट प्रार्थना करण्यास भाग पाडल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. नाव बदलण्याचा आणि ब्रेनवॉशचा कट संशयित निदा खान हिने पीडितेचे मूळ नाव बदलून 'हानिया' करण्याचा कट रचला होता. यासाठी तिने पीडितेला धार्मिक मुद्द्यांशी संबंधित तब्बल 171 लिंक्स पाठवल्या होत्या, जेणेकरून तिचे पूर्णपणे मतपरिवर्तन करता येईल. पीडितेच्या घरी जाऊन तिला धार्मिक शिक्षण देणे, ठराविक पोशाख परिधान करायला लावणे आणि धमार्ची प्रार्थना घेण्याचे धक्कादायक प्रकार निदाने केल्याचे एसआयटीच्या तपासात उघड झाले आहे. आश्रयदाता आणि 'एमआयएम' कनेक्शनचा तपास 26 मार्चपासून फरार असलेल्या निदाला 7 मे रोजी छत्रपती संभाजीनगरमधून अटक करण्यात आली होती. निदा ज्या फ्लॅटमध्ये लपली होती, तो फ्लॅट तिच्या मावशीचा नसून संशयित एमआयएम नगरसेवक मतीन पटेल यांनी उपलब्ध करून दिल्याचे समोर आले आहे. निदा गर्भवती असल्याने तिच्यासोबत तिचे आई-वडील आणि मावशीदेखील तिथे उपस्थित होते. निदा ही 'एमआयएम'च्या नगरसेवकापर्यंत कशी पोहोचली आणि तिला या काळात कोणी आर्थिक रसद पुरवली, याचा तपास आता पोलीस करत आहेत. पोलीस कोठडीत वाढ होण्याची शक्यता निदाची सुरुवातीची पोलीस कोठडी आज, सोमवारी (दि. 11) संपत असल्याने तिला पुन्हा नाशिकरोड न्यायालयात हजर केले जाणार आहे. तपासातील प्रगती आणि गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता, पोलीस तिच्या कोठडीत वाढ करण्याची मागणी करणार आहेत. यासह या प्रकरणातील इतर संशयित दानिश शेख आणि तौसिफ अत्तार यांचाही ताबा एसआयटी घेणार असून, तिघांची समोरासमोर बसवून चौकशी केली जाणार आहे. नाशिकमध्ये नऊ गुन्ह्यांची नोंद निदा खानसह तिच्या साथीदारांविरोधात नाशिकमध्ये आतापर्यंत अत्याचार, विनयभंग, धार्मिक भावना दुखावणे आणि कट रचून धर्मांतर करणे अशा विविध कलमान्वये नऊ गुन्हे दाखल आहेत. मुंबई नाका पोलिसांनीही या टोळीविरोधात कठोर कलमे लावून तपास सुरू केला आहे. निदा खानचा मोबाइल क्लोनिंगसाठी प्रयोगशाळेत पाठवला दरम्यान, ळउर प्रकरणातील आरोपी निदा खान हिचा मोबाईल क्लोनिंगसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आला आहे. मोबाईलमधून डिलिट केलेले मेसेज, व्हिडीओ आणि संपर्क क्रमांक पुन्हा रिकव्हर करण्यात येणार असून, त्यातून अनेक महत्त्वाच्या बाबींचा उलगडा होण्याची शक्यता आहे. तसेच कॉल डिटेल्स, वारंवार संपर्कात असलेल्या व्यक्ती, फरार काळातील लोकेशन हिस्ट्री आणि प्रवासाचा तपशीलही रक्ळ कडून तपासला जात असल्याची माहिती समोर आली आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com